**महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या गणवेषात बदल करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र.युएनएफ १०२२/प्र.क्र.२६५/पोल-४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक: ०९ ऑक्टोबर, २०२४**

**संदर्भ :** १) शासन निर्णय, गृह विभाग क्र.यूएनएफ १०९६/२८१४/१४/पोल-४, दि. ११.०९.१९९८,
२) अपर पोलीस महासंचालक, (नि.व स.) पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/४४/गर्भावस्था महिला पोलीस पट्टा/०३/२०२२/२१७, दि.२२.०७.२०२२,

**प्रस्तावना :-**

"महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या गणवेषात बदल करण्याबाबत" संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ११.०९.१९९८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला पोलीसांना गर्भधारणा झाल्यांनतर १६ आठवड्यांनी कर्तव्यावर असताना साडी परिधान करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

तथापि, महिलांचा गर्भधारणा झाल्यापासून पहिल्या महिन्यापासून १६ आठवडयाचा काळ महिलेच्या गर्भधारणेच्या दृष्टीने महत्वाचा व कसोटीचा असतो. या नाजुक काळात जर महिला पोलीसांना कमरेवर पट्टा धारण केला तर पोटावर अनावश्यक ताण येऊन गर्भपात होण्याची शक्यता असते. यासाठी सर्व पोलीस आयुक्त व सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक तसेच पोलीस शल्यचिकित्सक, पोलीस रुग्णालय, नागपाडा, मुंबई यांचे अभिप्राय विचारात घेता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या विनंतीनुसार महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांना गर्भधारणा झाल्यानंतर पहिल्या महिन्यापासून कर्तव्यावर असताना साडी वापरण्यास मुभा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला अधिकारी/अंमलदार यांना गर्भधारणा झाल्यानंतर पहिल्या महिन्यापासून कर्तव्यावर असताना साडी वापरण्यास मुभा देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तथापि, त्याकरिता महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांना संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेकडे गर्भधारणा झाली असल्याबाबत नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**२.** याव्यतिरिक्त, संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ११.०९.१९९८ रोजीच्या शासन निर्णयातील इतर तरतूदी कायम राहतील.

**३.** उपरोक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४१००९१९२९२१६६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरी साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**( रा.ता.भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. सर्व सन्मानिय संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य
५. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
६. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
११. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई-४०००३२
१४.प्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई (पत्राने)
१५.पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. सर्व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७.महासमादेशक, होमगार्डस,महाराष्ट्र राज्य,मुंबई
१८.महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई
२०.सर्व पोलीस आयुक्तालये, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२.सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. सर्व पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२४. सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५.अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२६. वित्त विभाग/व्यय-७
२७. निवडनस्ती /पोल-४